असा. क्र. २०८ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२११/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

**प्राधिकृत प्रकाशन**

मंगळवार, डिसेंबर १८, २००८/अग्रहायण २७, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग चार-अ

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ डिसेंबर २००८

### अधिसूचना

रताचे संविधान.

क्रमांक सेवाप्र-११.०७/प्र.क्र. १९६/१/कोषा (प्रशा-३).—भारताचे संविधान याच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, आणि याबाबतीत केलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, लेखा व कोषागारे संचालनालय, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यातील वरिष्ठ लेखापाल, कनिष्ठ लेखापाल आणि लेखा-लिपिक या पदांवरील सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना, लेखा व कोषागारे, गट-क सेवा (सेवाप्रवेश) नियम, २००८ असे म्हणावे.

२. या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " लेखा व कोषागारे, गट-क सेवा " याचा अर्थ, हे नियम अंमलात येण्याच्या दिनांकास अस्तित्वात असलेली उपलेखापाल या पदांसह वरिष्ठ लेखापाल, कनिष्ठ लेखापाल आणि लेखा-लिपिक

पदे असा आहे आणि त्यामध्ये, ज्या पदांवर या कर्मचाऱ्यांची प्रतिनियुक्ती किंवा बदली करण्यात येते अशी समतुल्य वेतनश्रेणीची इतर सर्व पदे यांचा समावेश होतो ;

(ख) " पदवी " याचा अर्थ, सांविधिक विद्यापीठाची पदवी, असा आहे ;

(ग) "सह/उप संचालक " याचा अर्थ, त्या त्या महसूल विभागाचा सह/उप संचालक, लेखा व कोषागारे, असा आहे ;

(घ) " वित्त विभाग " याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा वित्त विभाग, असा आहे ;

(ड) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(च) " उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा " याचा अर्थ, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४१) अन्वये विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा, असा आहे आणि त्यामध्ये, शासनाने त्यास समतुल्य म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही परीक्षा याचा समावेश होतो ;

(छ) " माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा " याचा अर्थ, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४१) अन्वये विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा, असा आहे आणि त्यामध्ये, शासनाने त्यास समतुल्य म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही परीक्षा याचा समावेश होतो ;

३. लेखा व कोषागारे, गट-क सेवेच्या प्रादेशिक संवर्गातील वरिष्ठ लेखापालाच्या पदावरील नियुक्ती, ज्यांनी त्या त्या प्रादेशिक संवर्गातील कनिष्ठ लेखापालाचे पद धारण केले असेल आणि त्या पदावर किमान तीन वर्षे इतकी नियमित सेवा केली असेल आणि ज्यांना महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा, गट-क सेवा विभागीय परीक्षा (भाग एक व दोन) उत्तीर्ण होण्यातून सूट मिळाली असेल किंवा ज्यांनी उक्त परीक्षा उत्तीर्ण केली असेल, अशा कनिष्ठ लेखापालाच्या त्या त्या प्रादेशिक संवर्गातील व्यक्तींमधून योग्यतेच्या अधीनतेने व ज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नतीद्वारे करण्यात येईल.

४. लेखा व कोषागारे, गट-क सेवेच्या प्रादेशिक संवर्गातील कनिष्ठ लेखापालाच्या पदावरील नियुक्ती एकतर,—

(क) ज्यांनी लेखा व कोषागारे, गट-क सेवेच्या त्या त्या प्रादेशिक संवर्गातील लेखा-लिपिकाचे पद धारण केले असेल आणि ज्यांनी त्या लेखा-लिपिक संवर्गात तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा केली असेल, आणि ज्यांना महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा, गट-क सेवा विभागीय परीक्षा (भाग एक) उत्तीर्ण होण्यातून सूट मिळाली असेल किंवा ज्यांनी उक्त परीक्षा उत्तीर्ण केली असेल, अशा लेखा-लिपिकाच्या त्या त्या प्रादेशिक संवर्गातील व्यक्तींमधून योग्यतेच्या अधीनतेने व ज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नतीद्वारे करण्यात येईल ; किंवा

(ख) (एक) ज्याचे वय ३३ वर्षांपेक्षा अधिक नसेल :

परंतु, अगोदरच शासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, वयोमर्यादा पाच वर्षांपर्यंत शिथिल करता येईल ; आणि

(दोन) ज्यांनी पुढील कोणतीही अर्हता, म्हणजे,—

(क) किमान ५५ टक्के इतक्या गुणांसह वाणिज्य शाखेची पदवी ; किंवा

(ख) सांख्यिकी, गणित किंवा अर्थशास्त्र असा मुख्य विषय घेऊन किमान ५५ टक्के इतक्या गुणांसह कला शाखेची पदवी ; किंवा

(ग) सांख्यिकी किंवा गणित असा मुख्य विषय घेऊन किमान ५५ टक्के इतक्या गुणांसह विज्ञान शाखेची पदवी धारण केली असेल ; किंवा

(घ) भारतीय परिव्यय व कार्य लेखापाल संस्थेकडून घेण्यात येणारी परिव्यय लेखाशास्त्राची अंतिम परीक्षा उत्तीर्ण केली असेल ; किंवा

(ङ) व्यवसाय प्रशासनाची पदवी धारण केली असेल ; किंवा

(च) कोणतीही पदवी आणि सनदी लेखापालाची मध्यम स्तरीय परीक्षा उत्तीर्ण केली असेल ; किंवा

(छ) संगणक तंत्रज्ञान किंवा संगणकशास्त्र किंवा माहिती तंत्रज्ञान यातील विशेषज्ञतेसह अभियांत्रिकीमधील पदवी धारण केली असेल, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :

परंतु, निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मते, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या उमेदवारांकरिता राखून ठेवलेली रिक्त पदे भरण्यासाठी उपखंड (क), (ख) आणि (ग) यांमध्ये नमूद केलेली किमान आवश्यक अर्हता धारण करणारे पुरेसे उमेदवार उपलब्ध नसतील तर, नियुक्ती प्राधिकाऱ्यास, अशा निवडीच्या बाबतीत, गुणांची अट ५० टक्क्यांपर्यंत शिथिल करता येईल, आणि अशा जाती किंवा जमातीच्या योग्य उमेदवारांची निवड करता येईल.

५. लेखा व कोषागारे, गट-क सेवेच्या प्रादेशिक संवर्गातील लेखा-लिपिकाच्या पदावरील नियुक्ती एकतर,—

(क) त्या त्या महसूल विभागाच्या सह/उप संचालक, लेखा व कोषागारे यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील विभिन्न कार्यालयातील गट ' ड ' मधील पद धारण केलेल्या व गट ' ड ' मधील त्या पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा झालेल्या आणि माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केलेल्या आणि या नियमाच्या उप खंड (ख) (२) मध्ये नमूद केलेली अर्हता धारण केलेल्या व्यक्तींमधून योग्यतेच्या अधीनतेने व ज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नतीद्वारे करण्यात येईल ; किंवा

(ख) (१) ज्याचे वय ३३ वर्षांपेक्षा अधिक नसेल :

परंतु, अगोदरच शासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, वयोमर्यादा पाच वर्षांपर्यंत शिथिल करता येईल ; आणि

(२) ज्यांनी किमान ५५ टक्के गुणांसह माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अशी अर्हता धारण केली असेल :

परंतु, पुढील उच्च अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल,—

(एक) वाणिज्य विषयासह उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा ; किंवा

(दोन) वाणिज्य शाखेची पदवी ; किंवा

(तीन) सांख्यिकी, गणित किंवा अर्थशास्त्र असा मुख्य विषय घेऊन कला शाखेची पदवी ; किंवा

(चार) सांख्यिकी किंवा गणित असा मुख्य विषय घेऊन विज्ञान शाखेची पदवी ; किंवा

(पाच) भारतीय परिव्यय व कार्य लेखापाल संस्थेकडून घेण्यात येणारी परिव्यय लेखाशास्त्राची अंतिम परीक्षा उत्तीर्ण केली असेल ; किंवा

(सहा) व्यवसाय प्रशासनाची पदवी ; किंवा

(सात) कोणतीही पदवी आणि सनदी लेखापालाची मध्यमस्तरीय परीक्षा उत्तीर्ण केली असेल :

परंतु, निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मते, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या उमेदवारांकरिता राखून ठेवलेली रिक्त पदे भरण्यासाठी उप खंड (ख) (२) मध्ये नमूद केलेली किमान आवश्यक अर्हता धारण करणारे पुरेसे उमेदवार उपलब्ध नसतील तर, नियुक्ती प्राधिकाऱ्यास, अशा निवडीच्या बाबतीत, गुणांची अट ५० टक्क्यांपर्यंत शिथिल करता येईल आणि अशा जाती किंवा जमातीच्या योग्य उमेदवारांची निवड करता येईल ; आणि

(३) ज्यांनी मराठी टंकलेखन प्रति मिनिट ३० शब्द किंवा इंग्रजी टंकलेखन प्रति मिनिट ४० शब्द इतक्या वेगाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केले असेल, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल.

६. नियम ४ व ५ यामध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीद्वारे आणि नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्त्या, अनुक्रमे १:२ आणि १:४ या प्रमाणात करण्यात येतील :

परंतु, पदोन्नतीसाठी पुरेसे पात्र उमेदवार उपलब्ध नसतील तर, नियुक्ती प्राधिकाऱ्यास, नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्त्यांचे प्रमाण वाढविता येईल.

७. नियम ३, ४ किंवा ५, यांमध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार मराठी व हिंदी भाषा परीक्षा अगोदर उत्तीर्ण केलेल्या नसतील, किंवा त्या उत्तीर्ण करण्यापासून त्याला सूट मिळाली नसेल तर, त्या परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक असेल.

८. नियम ४ आणि ५ यामध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा, गट-क सेवा विभागीय परीक्षा, अनुक्रमे (भाग-एक आणि दोन) व (भाग-एक) ही, विभागीय परीक्षा अगोदर उत्तीर्ण केली नसेल तर, अशी विभागीय परीक्षा विहित कालावधीच्या/संधीच्या आत उत्तीर्ण करणे आवश्यक असेल.

९. नियम ३, ४ किंवा ५ यामध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाकडून विहित करण्यात आले असेल असे संगणक हाताळण्याबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

१०. नियम ३, ४ किंवा ५ यामध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, लेखा व कोषागारे संचालनालयाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील त्या त्या महसूल विभागातील कार्यालयांत, किंवा स्थानिक निधी लेखा विभाग, यातील पदांसह त्या त्या महसूल विभागातील इतर शासकीय कार्यालयांमधील समतुल्य वेतन श्रेणीच्या इतर कोणत्याही पदांवर बदली केली जाण्यास पात्र असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सुधीर श्रीवास्तव,**

शासनाचे सचिव (वित्तीय सुधारणा).

प्रत :

राज्यपाल यांचे सचिव.

मुख्य सचिव.

मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.

उप मुख्यमंत्र्यांचे सचिव.

मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव.

राज्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव.

प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग.

प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग.

संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

सर्व विभागीय सह/उप संचालक, लेखा व कोषागारे.

सर्व कोषागार अधिकारी.

संचालक, भाषा संचालनालय, मुंबई (५ प्रती).

कार्यासन अधिकारी, कार्यासन-१२, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

कार्यासन अधिकारी, ब शाखा, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.

निवड नस्ती (कोषा. प्रशा. ३).

## FINANCE DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 2nd December 2008

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. Sevapra-11.07/C.R.-196/1/KOSHA (PRASHA-3).— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of all existing rules, orders or instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the posts of Senior Accountant, Junior Accountant and Accounts-Clerk in the Directorate of Accounts and Treasuries, Finance Department, Government of Maharasthra, namely :—

1. These rules may be called the Accounts and Treasuries, Group-C Service (Recruitment) Rules, 2008.

2. In these rules, unless the context requires otherwise,—

(*a*) " Accounts and Treasuries, Group-C Service " means Senior Accountant including the posts of Deputy Accountant existing on the date of coming into force of these rules, Junior Accountant and Accounts Clerk and includes all other posts of equivalent pay scale on which these employees are deputed or transferred ;

(*b*) " degree " means a degree of a statutory university ;

(*c*) " Joint/Deputy Director " means Joint/Deputy Director, Accounts and Treasuries of the respective Revenue Division ;

(*d*) " Finance Department " means the Finance Department of the Government of Maharashtra ;

(*e*) " Government " means the Government of Maharashtra ;

(*f*) " Higher Secondary School Certificate Examination " means the Higher Secondary School Certificate Examination conducted by the Divisional Board under the Maharashtra Secondary and Higher Secondary Education Board Act, 1965 (Mah. XLI of 1965) and includes any other Examination declared by Government to be equivalent thereto ;

(*g*) " Secondary School Certificate Examination " means the Secondary School Certificate Examination conducted by the Divisional Board under the Maharashtra Secondary and Higher

Secondary Education Board Act, 1965 (Mah. XLI of 1965) and includes any other examination declared by Government to be equivalent thereto ;

3. Appointment to the post in the regional cadre of Senior Accountant in the Accounts and Treasuries, Group-C Service shall be made by promotion on the basis of seniority subject to fitness from amongst the persons from the respective regional cadre of Junior Accountant who has completed minimum three years of regular service in that post and who has passed the Maharashtra Accounts and Local Fund Accounts, Group-C Service Departmental Examination (Part I and II), unless he has been exempted from passing the said examination.

4. Appointment to the post in the regional cadre of Junior Accountant in the Accounts and Treasuries, Group-C Service shall be made either—

(*a*) by promotion on the basis of seniority subject to fitness from amongst the persons from the respective regional cadre of Accounts-Clerk in the Accounts and Treasuries, Group-C Service who has completed not less than three years of regular service in the cadre of Accounts-Clerk and has passed the Maharashtra Accounts and Local Fund Accounts, Group-C Service Departmental Examination (Part I), unless he has been exempted from passing the said examination ; or

(*b*) by nomination from amongst the candidates who,—

(*i*) is not more than 33 years of age :

Provided that, the age limit may be relaxed by five years in the case of a candidate already in the service of the Government, and

(*ii*) possesses any of the following qualifications,—

(*a*) a degree with at least 55% marks in Commerce, or

(*b*) a degree in Arts with at least 55% marks with Statistics, Mathematics or Economics as the principal subject, or

(*c*) a degree in Science with at least 55% marks with Statistics or Mathematics as the principal subject, or

(*d*) has passed the final examination of Cost Accountancy conducted by the Institute of Cost and Works Accountants of India, or

(*e*) a degree in Business Administration, or

(*f*) any degree and has also passed the intermediate examination for Chartered Accountants, or

(*g*) degree in Engineering with specialization in Computer Technology or Computer Science or Information Technology :

Provided that, if at any stage of selection, the appointing authority is of the opinion that sufficient number of candidates possessing the requisite minimum qualification enumerated in sub-clauses (*a*), (*b*) and (*c*) are not available to fill up the vacancies reserved for the candidates belonging to the Scheduled Castes and Scheduled Tribes, the appointing authority may, in the matter of such selection, relax the condition of marks up to 50% and select the suitable candidates belonging to such Castes or Tribes.

5. Appointment to the post in the regional cadre of Accounts-Clerk in the Accounts and Treasuries, Group-C Service shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person on the basis of seniority subject to fitness from amongst the persons from the cadre of Group-D posts in various offices under the administrative control of the Joint/Deputy Director, Accounts and Treasuries in the respective Revenue Division, who has completed not less than three years of regular service in Group-D posts and has passed the Secondary School Certificate Examination and possesses the qualification mentioned in clause (b) (3) of this rule ; or

(*b*) by nomination from amongst the cadidates who,—

(*1*) is not more than 33 years of age :

Provided that, the age limit may be relaxed by five years in the case of candidates already in the service of the Government, and

(*2*) possesses the Secondary School Certificate Examination with at least 55% marks :

Provided that, preference may be given to the candidates possessing the following higher qualification,—

(*i*) Higher Secondary School Certificate Examination with Commerce as one of the subjects ; or

(*ii*) a degree in Commerce, or

(*iii*) a degree in Arts with Statistics, Mathematics or Economics as the principal subject, or

(*iv*) a degree in Science with statistics or Mathematics as the principal subject, or

(*v*) has passed the final exmination of Cost Accountancy conducted by the Institute of Cost and Works Accountants of India, or

(*vi*) a degree of Business Administration, or

(*vii*) any degree and has passed the intermediate examination for Chartered Accountants :

Provided that, if at any stage of selection, the appointing authority is of the opinion that sufficient number of candidates possessing the requisite minimum qualification enumerated in clause (*b*) (*2*) are not available to fill up the vacancies reserved for the candidates belonging to the Scheduled Castes and Scheduled Tribes, the appointing authority may, in the matter of such selection, relax the condition of marks upto 50% and select the suitable candidates belonging to such Castes or Tribes, and

(*3*) possesses Government Commercial Certificate of Marathi typing with minimum 30 w.p.m. or English typing with minimum 40 w.p.m.

6. The appointment to the posts mentioned in rules 4 and 5 by promotion and by nomination shall be made in the ratio 1 : 2 and 1 : 4, respectively :

Provided that, if adequate eligible candidates for promotions are not available, the appointing authority may increase the ratio of appointment by nomination.

7. A person appointed to the posts mentioned in rules 3, 4 or 5 shall be required to pass the examinations in Marathi and Hindi according to the rules made in this behalf, unless he has already passed, or has been exempted from passing those examinations.

8. A person appointed to the posts mentioned in rules 4 and 5 shall be required to pass the Departmental Examination, known as the Maharashtra Accounts and Local Fund Accounts, Group-C Service Departmental Examination (Part I and II) and (Part I), respectively, within prescribed period/chances.

9. A person appointed to the posts mentioned in rules 3, 4 or 5 shall possess a certificate in Computer Operation as prescribed by the Directorate of Information Technology of Government.

10. A person appointed on the posts mentioned in rules 3, 4 or 5 shall be liable for transfer within the respective Revenue Division in the offices under the administrative control of the Directorate of Accounts and Treasuries, or on any other posts of equivalent pay scale in other Government offices in the respective Revenue Division including those in the Local Fund Accounts.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SUDHIR SHRIVASTAVA,
Secretary to Government (Financial Reforms).

Copy forwarded with compliments for information to :—

The Secretary to Governor,

The Chief Secretary to Government,

The Principal Secretary to Chief Minister,

The Secretary to the Deputy Chief Minister,

Private Secretary to the Minister of Finance,

Private Secretary to the State Minister of Finance,

The Principal Secretary, General Administration Department,

The Principal Secretary, Law and Judiciary Department,

The Director, Accounts and Treasuries, Maharashtra State, Mumbai,

The Chief Auditor, Local Fund Accounts, Navi Mumbai,

The Pay and Accounts Officer, Mumbai,

All Divisional Joint/Deputy Director of Accounts and Treasuries,

All Treasury Officers.

The Director, Directorate of Languages, Mumbai,

Desk Officer, Desk-12, General Administration Department,

Desk Officer, B-branch, Law and Judiciary Department,

Select File, Kosha (Prasha-3).

## वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ डिसेंबर २००८

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक सेवाप्र-११.०७/प्र.क्र. १९६/२/कोषा (प्रशा-३).—भारताचे संविधान याच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, आणि याबाबतीत केलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख यांचे अधिक्रमण करून,महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, स्थानिक निधी लेखा, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यातील वरिष्ठ लेखापरीक्षक, कनिष्ठ लेखापरीक्षक, आणि लेखापरीक्षा-लिपिक या पदांवरील सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना, स्थानिक निधी लेखा, गट-क सेवा (सेवाप्रवेश) नियम, २००८, असे म्हणावे.

२. या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " स्थानिक निधी लेखा, गट-क सेवा " याचा अर्थ, वरिष्ठ लेखापरीक्षक, कनिष्ठ लेखापरीक्षक आणि लेखापरीक्षा-लिपिक, असा आहे आणि त्यामध्ये, या कर्मचाऱ्यांची प्रतिनियुक्ती किंवा बदली करण्यात येते अशा समतुल्य वेतनश्रेणीची इतर सर्व पदे यांचा समावेश होतो ;

(ख) " पदवी " याचा अर्थ, सांविधिक विद्यापीठाची पदवी, असा आहे ;

(ग) " सह मुख्य लेखापरीक्षक/उप मुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ) " याचा अर्थ, त्या त्या महसूल विभागाचा सह मुख्य लेखा परीक्षक/उप मुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, असा आहे ;

(घ) " वित्त विभाग " याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा वित्त विभाग, असा आहे ;

(ङ) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(च) " उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा " याचा अर्थ, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४१) अन्वये विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा, असा आहे आणि त्यामध्ये, शासनाने त्यास समतुल्य म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही परीक्षा याचा समावेश होतो ;

(छ) " माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा " याचा अर्थ, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४१) अन्वये विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा, असा आहे आणि त्यामध्ये, शासनाने त्यास समतुल्य म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही परीक्षा याचा समावेश होतो.

३. स्थानिक निधी लेखा, गट-क सेवेच्या प्रादेशिक संवर्गातील वरिष्ठ लेखापरीक्षकाच्या पदावरील नियुक्ती, ज्यांनी त्या त्या प्रादेशिक संवर्गातील कनिष्ठ लेखापरीक्षकाचे पद धारण केले असेल आणि त्या पदावर किमान तीन वर्षे इतकी नियमित सेवा केली असेल आणि ज्यांना महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा, गट-क सेवा विभागीय परीक्षा (भाग एक व दोन), उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली असेल किंवा ज्यांनी

उक्त परीक्षा उत्तीर्ण केली असेल, अशा कनिष्ठ लेखापरीक्षकाच्या त्या त्या प्रादेशिक संवर्गातील व्यक्तींमधून योग्यतेच्या अधीनतेने व ज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नतीद्वारे करण्यात येईल.

४. स्थानिक निधी लेखा, गट-क सेवेच्या प्रादेशिक संवर्गातील कनिष्ठ लेखापरीक्षकाच्या पदावरील नियुक्ती एकतर,—

(क) ज्यांनी स्थानिक निधी लेखा, गट-क सेवेच्या त्या त्या प्रादेशिक संवर्गातील लेखापरीक्षा-लिपिकाचे पद धारण केले असेल आणि ज्यांनी त्या लेखापरीक्षा-लिपिक संवर्गात तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा केली असेल, आणि ज्यांना महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा, गट-क सेवा विभागीय परीक्षा (भाग एक) उत्तीर्ण होण्यातून सूट मिळाली असेल किंवा ज्यांनी उक्त परीक्षा उत्तीर्ण केली असेल, अशा लेखापरीक्षा-लिपिकाच्या त्या त्या प्रादेशिक संवर्गातील व्यक्तींमधून योग्यतेच्या अधीनतेने व ज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नतीद्वारे करण्यात येईल ; किंवा

(ख) (एक) ज्याचे वय ३३ वर्षांपेक्षा अधिक नसेल :

परंतु, अगोदरच शासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, वयोमर्यादा पाच वर्षांपर्यंत शिथिल करता येईल ; आणि

(दोन) ज्यांनी पुढील कोणतीही अर्हता, म्हणजे,—

(क) किमान ५५ टक्के इतक्या गुणांसह वाणिज्य शाखेची पदवी ; किंवा

(ख) सांख्यिकी, गणित किंवा अर्थशास्त्र असा मुख्य विषय घेऊन किमान ५५ टक्के इतक्या गुणांसह कला शाखेची पदवी ; किंवा

(ग) सांख्यिकी किंवा गणित असा मुख्य विषय घेऊन किमान ५५ टक्के इतक्या गुणांसह विज्ञान शाखेची पदवी धारण केली असेल ; किंवा

(घ) भारतीय परिव्यय व कार्य लेखापाल संस्थेकडून घेण्यात येणारी परिव्यय लेखाशास्त्राची अंतिम परीक्षा उत्तीर्ण केली असेल ; किंवा

(ड) व्यवसाय प्रशासनाची पदवी धारण केली असेल ; किंवा

(च) कोणतीही पदवी आणि सनदी लेखापालाची मध्यम स्तरीय परीक्षा उत्तीर्ण केली असेल ; किंवा

(छ) संगणक तंत्रज्ञान किंवा संगणकशास्त्र किंवा माहिती तंत्रज्ञान यातील विशेषज्ञतेसह अभियांत्रिकीमधील पदवी धारण केली असेल, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :

परंतु, निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मते, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या उमेदवारांकरिता राखून ठेवलेली रिक्त पदे भरण्यासाठी, उप-खंड (क), (ख) आणि (ग) यांमध्ये नमूद केलेली किमान आवश्यक अर्हता धारण करणारे पुरेसे उमेदवार उपलब्ध नसतील तर, नियुक्ती प्राधिकाऱ्यास, अशा निवडीच्या बाबतीत, गुणांची अट ५० टक्क्यांपर्यंत शिथिल करता येईल आणि अशा जाती किंवा जमातीच्या योग्य उमेदवारांची निवड करता येईल.

५. स्थानिक निधी लेखा, गट-क सेवेच्या प्रादेशिक संवर्गातील लेखापरीक्षा-लिपिकाच्या पदावरील नियुक्ती एकतर,—

(क) त्या त्या महसूल विभागाच्या सह मुख्य लेखापरीक्षक/उप मुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील विभिन्न कार्यालयातील गट-' ड ' मधील पद धारण केलेल्या व गट-' ड ' मधील पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा झालेल्या आणि माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केलेल्या आणि या नियमाच्या उप खंड (ख) (३) मध्ये नमूद केलेली अर्हता धारण केलेल्या व्यक्तिंमधून योग्यतेच्या अधीनतेने व ज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नतीद्वारे करण्यात येईल ; किंवा

(ख) (१) ज्याचे वय ३३ वर्षांपेक्षा अधिक नसेल :

परंतु, अगोदरच शासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, वयोमर्यादा पाच वर्षांपर्यंत शिथिल करता येईल ; आणि

(२) ज्यांनी किमान ५५ टक्के गुणांसह माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अशी अर्हता धारण केली असेल :

परंतु, पुढील उच्च अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल,—

(एक) वाणिज्य हा एक विषय घेऊन उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा ; किंवा

(दोन) वाणिज्य शाखेची पदवी ; किंवा

(तीन) सांख्यिकी, गणित किंवा अर्थशास्त्र असा मुख्य विषय घेऊन कला शाखेची पदवी ; किंवा

(चार) सांख्यिकी किंवा गणित असा मुख्य विषय घेऊन विज्ञान शाखेची पदवी ; किंवा

(पाच) भारतीय परिव्यय व कार्य लेखापाल संस्थेकडून घेण्यात येणारी परिव्यय लखाशास्त्राची अंतिम परीक्षा उत्तीर्ण केली असेल ; किंवा

(सहा) व्यवसाय प्रशासनाची पदवी ; किंवा

(सात) कोणतीही पदवी आणि सनदी लेखापालाची मध्यम स्तरीय परीक्षा उत्तीर्ण केली असेल :

परंतु, निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मते, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या उमेदवारांकरिता राखून ठेवलेली रिक्त पदे भरण्यासाठी उप-खंड (ख) (२) मध्ये नमूद केलेली किमान आवश्यक अर्हता धारण करणारे पुरेसे उमेदवार उपलब्ध नसतील तर, नियुक्ती प्राधिकाऱ्यास, अशा निवडीच्या बाबतीत, गुणांची अट ५० टक्क्यांपर्यंत शिथिल करता येईल आणि अशा जाती किंवा जमातीच्या योग्य उमेदवारांची निवड करता येईल ; आणि

(३) ज्यांनी मराठी टंकलेखन प्रति मिनिट ३० शब्द किंवा इंग्रजी टंकलेखन प्रति मिनिट ४० शब्द इतक्या वेगाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केले असेल, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल.

६. नियम ४ व ५ यामध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीद्वारे आणि नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्त्या, अनुक्रमे १:२ आणि १:४ या प्रमाणात करण्यात येतील :

परंतु , पदोन्नतीसाठी पुरेसे पात्र उमेदवार उपलब्ध नसतील तर, नियुक्ती प्राधिकाऱ्यास, नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्त्यांचे प्रमाण वाढविता येईल.

७. नियम ३, ४ किंवा ५ यांमध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार मराठी व हिंदी भाषा परीक्षा अगोदर उत्तीर्ण केलेल्या नसतील, किंवा त्या उत्तीर्ण करण्यापासून त्याला सूट मिळाली नसेल तर, त्या परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक असेल.

८. नियम ४ आणि ५ यामध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा, गट-क सेवा विभागीय परीक्षा, अनुक्रमे (भाग-एक आणि दोन) व (भाग-एक) ही विभागीय परीक्षा अगोदर उत्तीर्ण केलेली नसेल तर, अशी विभागीय परीक्षा विहित कालावधीच्या/संधीच्या आत उत्तीर्ण करणे आवश्यक असेल.

९. नियम ३, ४ किंवा ५ यांमध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाकडून विहित करण्यात आले असेल असे संगणक हाताळण्याबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

१०. नियम ३, ४ किंवा ५ यांमध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील त्या त्या महसूल विभागातील कार्यालयांत, किंवा लेखा व कोषागारे यांतील पदांसह त्या त्या महसूल विभागातील इतर शासकीय कार्यालयांमधील समतुल्य वेतनश्रेणीच्या इतर कोणत्याही पदांवर बदली केली जाण्यास पात्र असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सुधीर श्रीवास्तव,
शासनाचे सचिव (वित्तीय सुधारणा).

प्रत

राज्यपाल यांचे सचिव.

मुख्य सचिव.

मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.

उप मुख्यमंत्र्यांचे सचिव.

मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव.

राज्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव.

प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग.

प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग.

संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ०२१.

मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई,

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

सर्व विभागीय सह/उप संचालक, लेखा व कोषागारे.

सर्व सह मुख्य लेखापरीक्षक/उप मुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा

सर्व उप मुख्य लेखापरीक्षक (कनिष्ठ), स्थानिक निधी लेखा

सर्व कोषागार अधिकारी.

संचालक, भाषा संचालनालय, मुंबई (५ प्रती).

कार्यासन अधिकारी, कार्यासन-१२, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

कार्यासन अधिकारी, ब-शाखा, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.

निवड नस्ती (कोषा. प्रशा. ३).

## FINANCE DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 2nd December 2008

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. Sevapra-11.07/C.R. 196/2/KOSHA (PRASHA-3).— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of all existing rules, orders or instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the posts of Senior Auditor, Junior Auditor and Audit-Clerk in Local Fund Accounts, Finance Department, Government of Maharasthra, namely :—

1. These rules may be called the Local Fund Accounts, Group-C Service (Recruitment) Rules, 2008.

2. In these rules, unless the context requires otherwise,—

(*a*) " Local Fund Accounts, Group-C Service " means the Senior Auditor, Junior Auditor and Audit-Clerk and includes all other posts of equivalent pay scale on which these employees are deputed or transferred ;

(*b*) " degree " means a degree of a statutory university ;

(*c*) " Joint Chief Auditor/Deputy Chief Auditor (Senior) " means the Joint Chief Auditor/Deputy Chief Auditor (Senior), Local Fund Accounts of the respective Revenue Division ;

(*d*) " Finance Department " means the Finance Department of the Government of Maharashtra ;

(*e*) " Government " means the Government of Maharashtra ;

(*f*) " Higher Secondary School Certificate Examination " means the Higher Secondary School Certificate Examination conducted by the Divisional Board under the Maharashtra Secondary and Higher Secondary Education Board Act, 1965 (Mah. XLI of 1965) and includes any other Examination declared by Government to be equivalent thereto ;

(*g*) " Secondary School Certificate Examination " means the Secondary School Certificate Examination conducted by the Divisional Board under the Maharashtra Secondary and Higher Secondary

Education Board Act, 1965 (Mah. XLI of 1965) and includes any other examination declared by Government to be equivalent thereto.

3. Appointment to the post in the regional cadre of Senior Auditor in the Local Fund Accounts, Group-C Service shall be made by promotion on the basis of seniority subject to fitness from amongst the persons from the respective regional cadre of Junior Auditor who has completed minimum three years of regular service in that post and who has passed the Maharashtra Accounts and Local Fund Accounts, Group-C Service Departmental Examination (Part I and II), unless he has been exempted from passing the said examination.

4. Appointment to the post in the regional cadre of Junior Auditor in the Local Fund Accounts, Group-C Service shall be made either—

(*a*) by promotion on the basis of seniority subject to fitness from amongst the persons from the respective regional cadre of Audit-Clerk in the Local Fund Accounts, Group-C Service who has completed not less than three years of regular service in the cadre of Audit-Clerk and has passed the Maharashtra Accounts and Local Fund Accounts, Group-C Service Departmental Examination (Part I), unless he has been exempted from passing the said examination ; or

(*b*) by nomination from amongst the candidates who,—

(*i*) is not more than 33 years of age :

Provided that, the age limit may be relaxed by five years in the case of a candidate already in the service of the Government, and

(*ii*) possesses any of the following qualifications,—

(*a*) a degree with at least 55% marks in Commerce, or

(*b*) a degree in Arts with at least 55% marks with Statistics, Mathematics or Economics as the principal subject, or

(*c*) a degree in Science with at least 55% marks with Statistics, or Mathematics as the principal subject, or

(*d*) has passed the final examination of Cost Accountancy conducted by the Institute of Cost and Works Accountants of India, or

(*e*) a degree in Business Administration, or

(*f*) any degree and has also passed the intermediate examination for Chartered Accountants, or

(*g*) a degree in Engineering with specialization in Computer Technology or Computer Science or Information Technology :

Provided that, if at any stage of selection, the appointing authority is of the opinion that sufficient number of candidates possessing the requisite minimum qualification enumerated in sub-clauses (*a*), (*b*) and (*c*) are not available to fill up the vacancies reserved for the candidates belonging to the Scheduled Castes and Scheduled Tribes, the appointing authority may, in the matter of such selection, relax the condition of marks upto 50% and select the suitable candidates belonging to such Castes or Tribes.

5. Appointment to the post in the regional cadre of Audit-Clerk in the Local Fund Accounts, Group-C Service shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person on the basis of seniority subject to fitness from amongst the persons from the cadre of Group-D posts in various offices under the administrative control of the Joint Chief Auditor/Deputy Chief Auditor (Senior), Local Fund Accounts in the respective Revenue Division, who has completed not less than three years of regular service in Group-D posts and has passed the Secondary School Certificate Examination, and possesses the qualification mentioned in clause (*b*) (*3*) of this rule ; or

(*b*) by nomination from amongst the cadidates who,—

(*1*) is not more than 33 years of age :

Provided that, the age limit may be relaxed by five years in the case of candidates already in the service of the Government, and

(*2*) possesses the Secondary School Certificate Examination with at least 55% marks :

Provided that, preference may be given to the candidates possessing the following higher qualification,—

(*i*) Higher Secondary School Certificate Examination with Commerce as one of the subjects, or

(*ii*) a degree in Commerce, or

(*iii*) a degree in Arts with Statistics, Mathematics or Economics as the principal subject, or

(*iv*) a degree in Science with Statistics or Mathematics as the principal subject, or

(*v*) has passed the final examination of Cost Accountancy conducted by the Institute of Cost and Works Accountants of India, or

(*vi*) a degree of Business Administration, or

(*vii*) any degree and has passed the intermediate examination for Chartered Accountants :

Provided that, if at any stage of selection, the appointing authority is of the opinion that sufficient number of candidates possessing the requisite minimum qualification enumerated in clause (*b*) (*2*) are not available to fill up the vacancies reserved for the candidates belonging to the Scheduled Castes and Scheduled Tribes, the appointing authority may, in the matter of such selection, relax the condition of marks upto 50% and select the suitable candidates belonging to such Castes or Tribes, and

(*3*) possesses Government Commercial Certificate of Marathi typing with minimum 30 w.p.m. or English typing with minimum 40 w.p.m.

6. The appointment to the posts mentioned in rules 4 and 5 by promotion and by nomination shall be made in the ratio 1 : 2 and 1 : 4, respectively :

Provided that, if adequate eligible candidates for promotions are not available, the appointing authority may increase the ratio of appointment by nomination.

7. A person appointed to the posts mentioned in rules 3, 4 or 5 shall be required to pass the examinations in Marathi and Hindi according to the rules made in this behalf, unless he has already passed, or has been exempted from passing those examinations.

8. A person appointed to the posts mentioned in rules 4 and 5 shall be required to pass the Departmental Examination, known as the Maharashtra Accounts and Local Fund Accounts, Group-C Service Departmental Examination (Part I and II) and (Part I), respectively, within prescribed period/chances.

9. A person appointed to the posts mentioned in rules 3, 4 or 5 shall possess a certificate in Computer Operation as prescribed by the Directorate of Information Technology of Government.

10. A person appointed on the posts mentioned in rules 3, 4 or 5 shall be liable for transfer within the respective Revenue Division in the offices under the administrative control of the Cheif Auditor, Local Fund Accounts, or on any other posts of equivalent pay scale in other Government offices in the respective Revenue Division including those in the Accounts and Treasuries.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SUDHIR SHRIVASTAVA,
Secretary to Government (Financial Reforms).

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

Copy forwarded with compliments for information to :—

The Secretary to Governor,

The Chief Secretary to Government,

The Principal Secretary to Chief Minister,

The Secretary to the Deputy Chief Minister,

Private Secretary to the Minister of Finance,

Private Secretary to the State Minister of Finance,

The Principal Secretary, General Administration Department,

The Principal Secretary, Law and Judiciary Department,

The Director, Accounts and Treasuries, Maharashtra State, Mumbai,

The Chief Auditor, Local Fund Accounts, Navi Mumbai,

The Pay and Accounts Officer, Mumbai,

All Divisional Joint/Deputy Director of Accounts and Treasuries,

All Joint Chief Auditor/Deputy Chief Auditor (Senior), Local Fund Accounts,

All Deputy Chief Auditor (Junior), Local Fund Accounts,

All Treasury Officers,

The Director, Directorate of Languages,

Desk Officer, Desk-12, General Administration Department,

Desk Officer, B-branch, Law and Judiciary Department,

Select File, Kosha (Adm-3).

असा. क्र. २१६ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६—०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

बुधवार, डिसेंबर ३१, २००८/पौष १०, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-अ

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ डिसेंबर २००८

### शुद्धिपत्र

क्रमांक सेवाप्र. ११.०७/प्र.क्र. १९६/कोषा-(प्र-३).—महाराष्ट्र शासन, **असाधारण राजपत्र**, भाग चार-अ, असा क्र. २०८, दिनांक १८ डिसेंबर २००८ याच्या पृष्ठे ८५० ते ८६८ वर प्रसिद्ध केलेली शासन अधिसूचना, वित्त विभाग क्र. सेवाप्र. ११.०७/प्र.क्र. १९६/१/कोषा (प्रशा-३), दिनांक २ डिसेंबर २००८



[ किंमत : रुपये ७.०० ]

व क्रमांक सेवाप्र. ११.०७/प्र.क्र. १९६/२/कोषा (प्रशा-३), दिनांक २ डिसेंबर २००८ मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्त्या वाचण्यात याव्यात :—

| अधिसूचनेतील मजकुराचा पृष्ठ, ओळ व शब्द क्रमांक (१) | अधिसूचनेतील मजकूर (२) | स्तंभ २ ऐवजी खालीलप्रमाणे वाचावे (३) |
|---|---|---|
| ८५५.८.१ | Maharasthra | Maharashtra |
| ८५७.२१.६ | Cadidates | Candidates |
| ८५८.३.५ | exmination | examination |
| ८६४.७.४ | Maharasthra | Maharashtra |
| ८६५.१९.४ | Examnination | Examination |
| ८६६.२१.६ | cadidates | candidates |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**नि. बा. वाडेकर,**
शासनाचे उप सचिव.



शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

प्रत,

राज्यपाल यांचे सचिव
मुख्य सचिव
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
उपमुख्यमंत्र्यांचे सचिव
मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव
राज्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव
प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग
प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग
संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
सर्व विभागीय सह/उपसंचालक, लेखा व कोषागारे,
सर्व सहमुख्य लेखा परिक्षक/उपमुख्य लेखा परिक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा
सर्व उपमुख्य लेखा परिक्षक (कनिष्ठ), स्थानिक निधी लेखा
सर्व कोषागार अधिकारी.
संचालक, भाषा संचालनालय, मुंबई
कार्यासन अधिकारी, कार्यासन-१२, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
कार्यासन अधिकारी, ब शाखा, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती, (कोषा. प्रशा. ३).